# ❋ श्रीराम २०१८-२०१९ ❋

## नियतकालिकाच्या स्वामित्त्वाबद्दल व अन्य तपशिलाबाबत निवेदन

| | | |
|---|---|---|
| ◆ प्रकाशन स्थळ | : | श्रीराम शिक्षण संस्था, पानीव<br>ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३११३<br>दूरध्वनी क्रमांक : (०२१८५) २७४२४४ |
| ◆ प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| ◆ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ◆ प्रकाशकाचे नांव व पत्ता | : | मा. सौ. श्रीलेखा प्रकाश पाटील<br>सचिव, श्रीराम शिक्षण संस्था, पानीव<br>ता. माळशिरस, जि. सोलापूर ४१३११३ |
| ◆ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ◆ संपादकाचे नांव | : | डॉ. हाके हरी बाबूराव<br>प्राचार्य, श्रीराम कृषी महाविद्यालय, पानीव<br>ता. माळशिरस, जि. सोलापूर<br>मो.: ९७६६७०१४८७ |
| ◆ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ◆ नियतकालिकाची मालकी | : | श्रीराम शिक्षण संस्था, पानीव<br>ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३११३ |
| ◆ मुखपृष्ठ कल्पना | : | संपादक मंडळ |

❋ या अंकात व्यक्त झालेल्या सर्वच विचारांशी
संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.❋

# श्रीराम शिक्षण संस्था, पानीव

## ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३११३

## * श्रीराम २०१८-२०१९ *

### मार्गदर्शक

**सौ. श्रीलेखा पाटील**
सचिव
श्रीराम शिक्षण संस्था, पानीव

**श्री. प्रकाश पाटील**
अध्यक्ष
श्रीराम शिक्षण संस्था, पानीव

### संपादक मंडळ

कार्यकारी संपादक
**श्री. हाके हरी बाबूराव**
प्राचार्य
श्रीराम कृषी महाविद्यालय
पानीव

सहसंपादक
**प्रा. बोडके तुकाराम अर्जुन**
अधिव्याख्याता
कृषी विस्तार विभाग
श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय, पानीव

### विभागीय संपादक

श्री. काळे टी. डी. (माध्य.व उच्च माध्यमिक)
कु. लोंढे ए. डी. (डी. फार्मसी)
श्री. घुले डी. ए.( श्रीराम इंग्लिश मिडियम स्कूल)
श्री. गुळवे व्ही. एम. (एस.आय.टी.आय.)
श्री. ननवरे वाय. के. (एस.आय.आय.टी.)
श्री. निकम आर. पी. (एस.आय.ई.टी.)

श्री. श्री. घाडगे एम. एम. (एस.आय.ई.टी.सी.)
श्री. कौलगे एस. ए. (श्रीराम कृषी महाविद्यालय)
कु. भोंगळे एस. बी. (श्रीराम महिला विज्ञान महाविद्यालय)
कु. पाटील एस. एन. (श्रीराम कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय)
श्री. बोडके टी. ए.. (श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय)
कु. शेळके बी. एन. (श्रीराम ए.बी.एम. महाविद्यालय)

# भावपूर्ण श्रध्दांजली



## कै. डॉ. अमृतराव (अप्पासाहेब) कृष्णाजी पवार

स्त्रीरोगतज्ज्ञ

जन्म : २१ सप्टेंबर १९३१

मृत्यु : २१ जानेवारी २०१९



# सर्वांगीण आणि सर्वस्पर्शी : डॉ. अमृतराव तथा अप्पासाहेब पवार

नासिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील मानुर येथे २१ सप्टेंबर १९३१ रोजी अप्पासाहेब पवार यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मानुर येथे, तर पुढील शिक्षणासाठी ते मराठा इंग्लिश स्कुल येथे गेले. उच्च शिक्षणासाठी ते अमळनेरच्या प्रताप महाविद्यालयामध्ये गेले. पुणे येथील प्रसिध्द बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एम.बी.बी.एस.डी.जी.ओ. व एम.डी. पर्यंतचे वैद्यकीय शिक्षण प्रथम क्रमांकाने पूर्ण केले. सुरूवातीला काही काळ पुण्यातीलच ससून हॉस्पिटलमध्ये रूग्णांची सेवा केली. सातारा जिल्ह्यामधील महाबळेश्वर येथे एम.जी.जी. रूग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून रूजू झाले. त्यानंतर अप्पासाहेबांच्या सेवेच्या कालावधीमध्ये नासिक येथील सरकारी जिल्हा रूग्णालय नावारूपाला आले.

अप्पासाहेबांनी त्यांच्या रूग्णसेवेच्या कालावधीत वैद्यकीय शिबीरांमध्ये ५५ हजारापेक्षा जास्त कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करून जागतिक रेकॉर्ड केले. त्यांनी १९६४ साली नासिकमध्ये वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. नासिकमधील कान्हेरेवाडी येथे १५ ऑगस्ट १९७० ला स्व:मालकीच्या ''चारूहास ''वास्तुत खाजगी वैद्यकीय व्यवसायाला सुरूवात केली. अप्पांनी वैद्यकीय व्यवसाय सांभाळत टोकीयो, कॅलीफोर्निया, सॅनफ्रान्सिस्को, सिंगापूर येथे अभ्यासदौरे करून वैद्यकीय क्षेत्रामधील अद्यावत तंत्रज्ञान आत्मसात करण्यात यशस्वी झाले. अप्पांच्या समर्पित रूग्णसेवेसाठी त्यांना नासिक स्त्रीरोगतज्ज्ञ संस्थेने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. अप्पांनी याच कालखंडात इंडियन मेडिकल असोसिएनचे अध्यक्ष म्हणूनही आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

समाजसेवेची आवड असलेल्या अप्पांना नासिक रोटरीचे अध्यक्ष होण्याचा मान १९७८-७९ ला मिळाला. याच कालावधीमध्ये अप्पांनी नासिकमध्ये स्त्रीरोग संघटनेच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले. त्यांची १९९४-१९९५ वर्षासाठी रोटरीच्या प्रांतपालपदी बिनविरोध निवड झाली. सन १९९८ मध्ये जगातील १५० रोटरियन्समध्ये अप्पासाहेबांना " Service Above Self " या सर्वोच्च सन्मानाने गौरविले गेले. सन २००५-२००७ दरम्यान अप्पासाहेबांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून स्वच्छता अभियान राबवून स्वत:चे जन्मगाव मानुर हागंदारीमुक्त केले.

अप्पासाहेब वैद्यकीय व्यवसाय सांभाळत सहकार क्षेत्रामध्येही कार्यरत होते. त्यांनी जनलक्ष्मी बँकेचे उपाध्यक्षपद भूषविले. सामाजिक क्षेत्रामध्ये ते सदैव कार्यरत असत. मौजे मानुर येथे वडील कै. कृष्णाजी कान्हूजी पवार यांच्या नावाने डिजीटल सोयींनीयुक्त असे अत्याधुनिक वाचनालय सुरू करून ग्रामीण भागामध्ये वाचन संस्कृती रूजविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. मानुरमध्ये इयत्ता १० वीत दरवर्षी प्रथम येणाऱ्या मुलींच्या पुढील उच्च शिक्षणासाठी स्वत:च्या आईच्या नावाने मातोश्री लक्ष्मीबाई पवार शिष्यवृत्ती सुरू केली.

पन्नास वर्षाच्या वैद्यकीय सेवेत अप्पासाहेबांनी सचोटीने आणि तेवढ्याच प्रामाणिकपणे प्रवास करताना स्वत:ची नवीन पाऊलवाट तयार केली. जुन्या बुरसटलेल्या मार्गाचा सडेतोडपणे धिक्कार करण्याचे धाडस दाखविले. अप्पासाहेब सेवाभावी वृत्तीचा स्वीकार करून समाजाच्या हृदयामध्ये आदरयुक्त स्थान मिळविण्यात यशस्वी झाले. अप्पासाहेबांनी सामजिक बांधिलकीचे भान ठेवून, कठोर मेहनत करून, कडवी शिस्त पाळून आणि कुटुंबामधील चांगल्या संस्कारांच्या शिदोरीच्या जोरावर जनसामान्यामध्ये सन्मानाचे स्थान तयार करून, आपण या समाजाचे बरेच काही देणे लागतो याचा आदर्श नवीन पिढीसमोर निर्माण केला. हेच 'अविश्रांत' असे अमृतराव तथा अप्पासाहेब पवार यांचे २१ जानेवारी २०१९ रोजी निधन झाले. प्रेरणास्थान असलेल्या अप्पासाहेबांना भावपूर्ण श्रध्दांजली !!!

डॉ. हाके हरी बाबूराव

# ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।

सन २०१८-२०१९ या वर्षात व दरम्यान काळात
देशातील  जे थोर नेते, देशभक्त, संशोधक,
जवान, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवक,
सामाजिक व सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते,
स्वातंत्र्यसेनानी, लेखक, कवी, खेळाडू तसेच
महाराष्ट्र व इतर राज्यात आलेली नैसर्गिक आपत्ती (महापूर)
विविध ठिकाणी झालेल्या दुर्घटनेमुळे दिवंगत नागरिक
तसेच श्रीराम शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी,
हितचिंतक दिवंगत झाले,
त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन करून
श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ।
हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



स्थापना १९९१

SHRIRAM
SHIKSHAN SANSTHA
॥ न हि ज्ञानेन सदृशं । पवित्रमिह विद्यते ॥

# Shriram Shikshan Sanstha, Paniv
# Tal. Malshiras, Dist. Solapur-413113

॥श्रीराम॥
२०१८-२०१९

## Vision :-

It is our vision to attain international standing in technical, technological and agricultural research contributing towards enhancement and empowerment of the society, country and in turn of the whole mankind. Our main objective is to focus upon the rural youth, their training and their career development in technical, technological, agricultural, pharmaceutical and teacher training education. We want to create social awareness among the students in particular and in the society in general. We want to develop scientific attitude in the students and make them judge everything on the basis of scientific knowledge, social justice, ecological balance, hummanitarian attitude and cultural values.

## Mission :-

Our dedicated mission is to impart value and time-based technical, technological & agricultural training supported by cultural and humanitarian view. We want to inculcate and cherish moral values and good interpersonal human relationship among the people in the world and humanity at large.

## Aims and Objectives :-

1) To provide quality education and in depth knowledge to all the students in every field of education.
2) To achieve academic excellence through our own channelised pattern of teaching-learning processes.
3) To promote research activities among the students and teachers.
4) To enhance industry-institute interaction to provide practical industrial exposure to the students and upgrade the knowledge of the faculty in respect advanced trends in technical fields.
5) To bring about all round development of the students through various Personality Development Programmes.
6) To develop awareness of social responsibilities in national Integration, Cultural values, humanitarian attitude among the students so as to make them ideal citizens of India.

# श्रध्दास्थान



**मा. श्री. शामराव भिमराव पाटील**
संस्थापक, श्रीराम शिक्षण संस्था, पानीव.

# श्रीराम शिक्षण संस्था, पानीव

## ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३११३

## * विश्वस्त मंडळ *




मा. श्री. प्रकाश शामराव पाटील
अध्यक्ष



मा. श्री. डॉ. सुनिल शामराव पाटील
उपाध्यक्ष



मा. सौ. श्रीलेखा प्रकाश पाटील
सचिव



मा. श्री. करण प्रकाश पाटील
सहसचिव



मा. श्री. दिनेश धोंडिबा शिंदे
खजिनदार / एस.ई.ओ.



मा. श्री. संतोष शांतीलाल फडे
सदस्य



मा. सौ. शालन सोपान बाबर
सदस्य

# मनोगत



ग्रामीण भागातील मुलांसाठी २१ व्या शतकातील शिक्षण मिळावे यासाठी माझ्या परिवाराची धडपड चालू असते. याच उद्देशाने त्यांनी श्रीराम शिक्षण संस्था चालू केली. आज बघता बघता ही संस्था ५००० विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा परिवार झाला आहे. येथे शिकलेला विद्यार्थी आयुष्याच्या संघर्षामध्ये कुठेही कमी पडू नये यासाठी आमचा सदैव प्रयत्न चालू असतो.

२१ वे शतक हे भारतातील युवकांचे शतक मानले जाते. आज जगात कौशल्यपूर्ण कामगारांची कमी आहे. २०२२ पर्यंत भारत हा संपूर्ण जगाला कौशल्यपूर्ण कामगार पुरवेल असे म्हटले जाते. या बदलत्या काळासाठी मुलामुलींना सुसज्ज करणे हा आमचा सर्वात मोठा उद्देश आहे. येणाऱ्या काळामध्ये संस्था आधुनिकतेकडे वळविण्याचा आमचा प्रयत्न राहील.

ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरात जास्त पैसे खर्च करून जाण्याची वेळ येऊ नये यासाठी शहरातल्या तोडीचे असणारे शिक्षण व दर्जा आम्ही येथे देण्याचा प्रयत्न करतो. आमचे स्वप्न आहे की, जागतिक दर्जाच्या नामवंत कंपनीत जसे गुगल, ॲपल, विप्रो अशांमध्ये आमचा विद्यार्थी दिसावा. 'श्रीराम' हा माझ्या पदार्पणातील अंक आपणापुढे ठेवतांना सर्वांना शुभेच्छा व सदिच्छा !

Karan Patil

श्री. करण प्रकाश पाटील
सहसचिव
श्रीराम शिक्षण संस्था, पानीव

# संपादक



भविष्यातील संवेदनशिल, सजग आणि सुजाण नागरिक घडविण्याचे काम शिक्षणच करू शकते. आपली शिक्षण संस्था भारतीय संस्कृतीचे केंद्र व्हावे म्हणूनच १९९१ साली ध्येयवेडे होऊन श्रीराम शिक्षण संस्थेची स्थापना माजी आमदार मा. श्री. शामराव भिमराव पाटील यांनी केली. मौजे पानीव येथे उजाड माळरानाचे आदर्श शैक्षणिक संकुलात रूपांतर करण्याच्या कामाचा ध्यास घेऊन कामगार, शेतमजूर, उपेक्षित, गरजू आणि ग्रामीण भागामधील शेतकऱ्यांच्या मुलां-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सुरूवातीला अंगणवाडी पासून सुरू केलेल्या संस्थेच्या कामाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आज पानीव सारख्या ग्रामीण भागामध्ये डी. फार्मसी, बी.फार्मसी, कृषि व कृषि संलग्न महाविद्यालये, इंजिनिअरिंग मधील विविध व्यवसाय अभ्यासक्रम, बी.सी.ए., बी.सी.एस. महिला विज्ञान महाविद्यालय, माध्यमिक व ज्यु. कॉलेज, श्रीराम सायन्स ॲकॅडमी, इंग्लिश मिडीयम स्कूल, आय.टी.आय. सर्व सोयींनीयुक्त मुला-मुलींचे वसतीगृह, भोजनालय इ. चे अठरा विभाग पुर्ण क्षमतेने कार्यरत आहेत.


आज संस्थेच्या विविध शाखेमध्ये ज्ञानदानाचे कार्य अखंडपणे कार्यरत असून या शाखा राज्यपातळीवर अभिनंदनास पात्र ठरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्याचप्रमाणे संस्थेच्या शाखांमधून प्रवेश घेणाऱ्या मुला-मुलींमध्ये राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे, त्यांचा बौध्दिक विकास व्हावा म्हणून वर्षभर विविध शैक्षणिक उपक्रम नियमितपणे घेतले जातात. शेती हा ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू ओळखून शेतीविषयक सुधारित अद्ययावत तंत्रज्ञान, शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्यासाठी कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये सदैव तत्पर असतात.

इंग्रजीमध्ये म्हण आहे की, "Today a reader, tomorrow a leader" भावी पिढीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आजच त्यांच्यात वाचनाची सवय रूजविण्यासाठीची मोठी गरज आहे. काळाची पावले ओळखून आम्ही आमच्या श्रीराम या संस्थास्तरीय वार्षिक २०१८-१९ चा अंक प्रसिध्द करत आहोत. वाचनाची ही प्रक्रिया केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती सातत्यपूर्ण रहावी हाच उदात्त हेतू या अंकाच्या प्रकाशनामागे आहे. या श्रीराम अंकामध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेतील नाविन वेध घेणारे असे विविध विषयांमधील लेख यांचा समावेश केलेला आहे. त्याचप्रमाणे संस्थेला वर्षभरामध्ये कार्यक्रमाच्या निमित्ताने भेटी दिलेल्या विविध मान्यवरांच्या छायाचित्रांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे.

या अंकामधून प्रसिध्द होणारे विविध अहवाल आमच्या विभागीय प्रगतीचा व वैयक्तिक कामगिरीचा लेखा-जोखा मांडत असतात. हे सर्वच अहवाल संबंधित संस्थेच्या या भव्य-दिव्य विकासाच्या वाटचालीमध्ये आमच्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याकरिता आम्हांस नेहमीच प्रेरणा व स्वातंत्र्य देतात,ते आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश पाटील, सचिव मा. सौ. श्रीलेखा पाटील, सहसचिव मा. श्री. करण (भैय्या) पाटील, सर्व विद्यमान संस्था संचालक मंडळातील सदस्य तसेच संस्थेचे एस.ई.ओ. आम्हांस मार्गदर्शन करतात म्हणूनच त्यांच्या या सक्रिय सहकार्यामुळे हा अंक प्रकाशित होवू शकला. या सर्वांचे मी संपादक या नात्याने आभार व्यक्त करतो. तसेच सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, विविध विभागाचे विभागप्रमुख व संपादक मंडळामधील माझे सर्व विभागीय संपादक यांना त्यांची नियमित जबाबदारी सांभाळून श्रीराम अंक २०१८-१९ प्रकाशन करणेकामी बहुमोल असे मला सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

डॉ. हाके हरी बाबूराव
प्राचार्य
श्रीराम कृषी महाविद्यालय, पानीव

# सहसंपादक



श्रीराम अंक २०१८-१९ या श्रीराम शिक्षण संस्थेच्या वार्षिक नियतकालिकेचे प्रकाशन करताना अतिशय आनंद होत आहे. कोणत्याही निर्मितीचा आनंद हा नेहमीच विलक्षण असतो आणि ही निर्मिती आपल्याच विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे फळ असेल तर तो एक अविस्मरणीय अनुभव असतो. सामाजिक व सांस्कृतिक या मध्यवर्ती आशेवर आधारित असलेला श्रीराम अंक आमच्या विद्यार्थ्यांच्या अथक मेहनतीतून आकाराला आला आहे.

या अंकामध्ये मदर तेरेसा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. नरेंद्र दाभोळकर या सर्वांच्या कार्याचा परिचय होतो. त्यांनी केलेले सामाजिक कार्य याचा प्रत्येय वाचकांना येईलच. संस्था नेहमीच सुजाण नागरिक घडविण्यासाठी प्रत्यनशिल आहे. येथे येणारा प्रत्येक विद्यार्थी उत्तम माणूस व्हावा यासाठी विविध अंगानी प्रत्यन केले जातात. श्रीराम अंक याच प्रयत्नाचा एक भाग आहे.

संस्थेच्या नियतकालिकेतून सर्व विभागीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातील कामगिरीची नोंद होत असते. वर्षभरातील विविध उपक्रम, मान्यवर भेटी, शैक्षणिक सहल व अहवाल या गोष्टींचा आढावाही या निमित्ताने प्रकाशित होत असतो. म्हणूनच या अंकाची निर्मिती एक महत्त्वाचा दस्तावेज मानला जातो. यावर्षी विविध विभागाचे उपक्रमाचे माहिती वेळेवर उपलब्ध करून दिली म्हणून सर्व प्राचार्य व विभागीय संपादकांचे आभार.

संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश पाटील, सचिव मा. सौ. श्रीलेखा पाटील, सहसचिव मा. श्री. करण (भैय्या) पाटील व प्राचार्य डॉ. एच. बी. हाके यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शनामुळेच या अंकाची निर्मिती होवू शकली आहे या अनमोल संधीसाठी मी या सर्वांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच हा अंक संकलन व संपादन करतेवेळी सहकार्य करणारे संस्थेचे इतर सर्व पदाधिकारी, सर्व प्राचार्य, विभागीय संपादक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पुर्वक आभार !

दिसामाजी काही तरी ते लिहावे ।
प्रसंगी अखंडित वाचित जावे ।

हा अंक वाचताना या दोन कवितेतील ओळीच्या अनुभुतीशी वाचक नक्कीच समरस होतील अशी आशा व्यक्त करतो.

TukaramBodake
श्री. बोडके तुकाराम अर्जुन
अधिव्याख्याता
श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय, पानीव

# संस्थेचे कर्णधार



श्री. वणवे बी. बी.
एस.ई.ओ.
श्रीराम शिक्षण संस्था,पानीव



श्री. झगडे पी. ए.
एस.ई.ओ.
श्रीराम शिक्षण संस्था,पानीव



श्री. बाबर व्ही. व्ही.
एस.ई.ओ.
प्राचार्य
श्रीराम महिला विज्ञान महाविद्यालय



श्री. घुले एस. के.
मुख्याध्यापक
श्रीराम माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय



डॉ. जेडगे एच. डी.
प्राचार्य
कॉलेज ऑफ फार्मसी



श्री. मुंडफणे एल. एस.
प्राचार्य
एस.आय.टी.आय.



डॉ. श्री. पवार एस. ए.
प्राचार्य
एस.आय.आय.टी.



श्री. डावकरे आर. आर.
उपप्राचार्य
एस.आय.आय.टी.



श्री. खंदारे पी. पी.
प्राचार्य
एस.आय.ई.टी.(पॉली)



श्री. धाईंजे पी. बी.
उपप्राचार्य
एस.आय.ई.टी.सी.



श्री. दिरंगे एम. एच.
समन्वयक
एस.आय.ई.टी.सी.



डॉ. हाके एच. बी.
प्राचार्य
श्रीराम कृषी महाविद्यालय



श्री. झांबरे ए. व्ही.
प्राचार्य
श्रीराम कृषी बी.टेक.



श्री. कोळेकर पी.टी.
प्राचार्य
श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय



डॉ. गोरे एस. टी.
प्राचार्य
श्रीराम ए. बी.एम.



श्री. जोशी एन. के.
मुख्याध्यापक
श्रीराम इंग्लिश स्कूल